महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र अंतर्गत सिंचन विहीर तसेच वैयक्तीक लाभाच्या योजनांची कुशल प्रदाने लाभार्थ्यांचे खात्यात थेट जमा करणेबाबत.

आयुक्तालय, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण
रोजगार हमी योजना-महाराष्ट्र, नागपूर
परिपत्रक क्रमांक मगांराग्रारोहयो/तांत्रिक/2018/794 दिनांक : 28/5/2018

संदर्भ : मा. मंत्री (रोहयो), महाराष्ट्र शासन यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या समृध्द महाराष्ट्र जनकल्याण योजनेच्या दिनांक 17 मे, 2018 रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.

प्रस्तावना :

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत कुशल कामांवर होणा-या खर्चाच्या रकमा गट विकास अधिकारी स्तरावरुन FTOs व्दारे आहरीत करुन त्या रकमा ग्राम पंचायतीचे खात्यांत जमा करण्यांत येतात. ग्राम पंचायतीचे बँक खात्यातुन सदरच्या रकमा धनादेशाव्दारे लाभार्थ्यांना प्रदान करण्यांत येतात. यांत बराच कालापव्यय होतो तसेच ग्राम पंचायतींकडुन लाभार्थ्यांना प्रदाने वेळेवर मिळत नसल्याने तक्रारींना सुध्दा वाव मिळत असतो. यावर उपाययोजना म्हणुन सिंचन विहीर तसेच वैयक्तिक लाभाच्या योजनांची कुशल प्रदाने लाभार्थ्यांचे खात्यांत थेट जमा करणेबाबत निर्देश देण्यांत येत आहेत.

## परिपत्रक :

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत कुशल कामांतर्गत सिंचन विहीर तसेच वैयक्तीक लाभाच्या योजनांवर होणा-या खर्चाच्या रकमा गट विकास अधिकारी स्तरावरुन FTOs व्दारे आहरीत करुन त्या यापूढे ग्राम पंचायतीच्या बँक खात्यांत जमा न करता संदर्भांकित बैठकीतील निर्णयान्वये सदरच्या रकमा यापूढे कुशल खर्चाचे लाभार्थ्यांचे खात्यांत थेट जमा करण्यांची कार्यवाही करण्यांत यावी.

गट विकास अधिकारी यांनी लाभार्थ्यांचे खात्यांत कुशल कामांतर्गत सिंचन विहीर तसेच वैयक्तीक लाभाच्या योजनांवर होणा-या कुशल खर्चाच्या रकमा थेट जमा करण्याकरीता NREGASoft वर जी प्रणाली विकसीत केली आहे, त्याच्या वापरासंबंधी कार्यपध्दती पुढीलप्रमाणे निश्चित करण्यांत येत आहे.

1. सिंचन विहीर तसेच वैयक्तिक लाभाच्या योजनांची कुशल प्रदाने ज्या लाभार्थ्यांना थेट प्रदान करावयाची आहेत तो लाभार्थी हा कुटुंब प्रमुखच असावा.

   सर्वप्रथम PO login मध्ये D1 Registration – Add Applicant मध्ये जाऊन Relationship या पर्यायात Head of Household (कुटुंब प्रमुख) समोर Self या पर्यायाला select करावे.
2. लाभार्थ्याचे खाते क्रमांक update व freeze नसल्यांस D-15 eFMS या पर्यायात जाऊन option 1 मध्ये update व option 3 मध्ये जाऊन Freeze करावे.
3. D-2 Works या पर्यायामध्ये Work on individual category च्या edit या पर्यायात जाऊन योग्य लाभार्थ्याचे job card निवडावे.
4. कामाचा DPR Freeze करावा.
5. D-29 Material या पर्यायामध्ये material procured details Entry for IHHL Beneficiery/individual category या option ला click करुन त्यात देयकाची नोंद करावी. सदर नोंद करतेवेळी लाभार्थ्याचे अचूक खातेक्रमांकाची पडताळणी करावी.
6. देयकाची नोंद झाल्यानंतर D-8 Material list या पर्यायामध्ये Generate material list option ला click करुन सदर देयकाची material list generate करावी.
7. यापुढील कार्यपध्दती म्हणजेच FTO तयार करणे व FTO sign करणे ही पूर्वीच्या प्रचलित कार्यपध्दती प्रमाणेच करण्यांत यावी.

उपरोक्त सूचनांचे काटेकोरपणे पालन करुन वैयक्तिक लाभाच्या योजनांची कुशल प्रदाने लाभार्थ्यांच्या खात्यामध्ये जमा करण्यांत यावी.

आयुक्त
महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण
रोजगार हमी योजना-महाराष्ट्र

प्रत सविनय सादर :

1. मा. सचिव, नियोजन विभाग (रोहयो), मंत्रालय, मुंबई.
2. मा. विभागीय आयुक्त, सर्व.

प्रतिलिपी माहितीकरीता :

1. जिल्हा कार्यक्रम समन्वयक तथा जिल्हाधिकारी, सर्व.
2. सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व.

3. उपसचिव (रोहयो), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
4. उपजिल्हाधिकारी (रोहयो), सर्व.
5. सर्व कार्यासन अधिकारी, रोहयो प्रभाग, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.